# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र. ९६/२०२६

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, भारताची जनगणना २०२७ या कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडून विद्यापीठ आस्थापनेतील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून आदेश प्राप्त झालेले आहेत.

तसेच विद्यापीठ आस्थापनेतील बहुतांश शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडून वैयक्तिकपणे एसएमएस व ईमेलव्दारे सदर जनगणनेच्या कामकाजाकरिता नियुक्ती आदेश बजावण्यात आल्याची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे जनगणनेच्या कामासाठी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची एकूण माहिती संकलित होण्यासाठी, अशा वैयक्तिक एसएमएस व ईमेलव्दारे नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांचा जनगणनासंदर्भातील नियुक्ती आदेश उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक / शिक्षकेतर कक्षास तात्काळ सादर करावा.

उपरोक्त अभावी सदर शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रजा आणि इतर बाबींची पूर्तता करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 1965
दिनांक : 25 MAY 2026

( प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार )
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.